2867

कारणे दाखवा नोटीस

जा.क्र.जिपना/शिअप्रा/प्रा-6/कादानो/2016
कार्यालय शिक्षण विभाग (प्रा) जि.प.नांदेड
दिनांक :- 6 JUN 2016

प्रति,

श्री. एस.ए. निलगिरवार,
प्राथमिक शिक्षक
जि.प.प्रा.शा.नुतन,भोकर

मार्फत :- गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती,भोकर.

विषय :- गैरशिस्तीच्या वर्तवणूकीबद्दल खातेनिहाय चौकशी बाबत.

महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम 1964 चे नियम 6(2) नुसार आपले विरुध्द चौकशी करण्याचे योजीले आहे. आपल्या ज्या गैरवर्तवणूकी अथवा गैरव्यवहाराची संबंधी चौकशी करण्याचे निर्णय घेण्यात आला आहे. त्या संबंधीच्या आरोपाची यादी सोबतच्या जोडपत्र-1 मध्ये आहे. त्याप्रमाणे तुमचेविरुध्द कायम केलेल्या प्रत्येक दोषारोपाच्या पृष्ठर्थ तुमच्या गैरवर्तवणूक अथवा गैरशिस्तीबाबतचे अभिकथन सोबतच्या जोडपत्र-2 मध्ये नमुद केले असून त्या कागदोपत्री पुरावाआधारे आणि साक्षी पुरावामुळे तुमचेवर आरोप प्रस्तावित करण्याचे योजिले आहे. त्या कागदोपत्राची यादी आणि साक्षीदारांची यादी जोडपत्र-3 व जोडपत्र-4 सोबत जोडली आहे.

आपणास या नोटीसव्दारे निर्देशित करण्यात येते की, तुमच्या या गैरकृत्याबाबत तुमच्यावर महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम 1964 चे नियम 4 मधील कोणतीही शास्ती लावून त्याप्रमाणे का कार्यवाही करण्यात येवू नये ? या विषयी तुम्ही हे पत्र मिळालेपासून 10 दिवसांत तुमच्या बचावाचे म्हणणे 2 प्रतीत गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती,भोकर यांचे मार्फत सादर करावे व आपले म्हणणे व्यक्तीश: मांडण्याची इच्छा असेल तरी तसेही नमुद करावे.

आपणास असेही कळविण्यात येते की, जे दोषारोप तुम्ही कबुल केलेले नाहीत तेवढा दोषारोपाच्या बाबतीत फक्त चौकशी केली जाईल. म्हणून तुम्ही प्रत्यक्ष दोषारोप विनिर्दिष्ट कबूल किंवा नाकबुल या संबंधी निवेदन दयावे.

आपणास असेही कळविण्यात येते की, उपरोक्त परिच्छेद-2 मध्ये निर्देश केलेल्या तारखेपूर्वी तुम्ही बचाव म्हणणे सादर केले नाही अगर चौकशी अधिकारी यांचे पुढे स्वत: समक्ष हजर राहीले नाही किंवा महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम 1964 चे नियम 6(2) मधील तरतुदीची अगर उपरोक्त नियमाच्या संबंधित आदेश सुचनांची पुर्तता करण्यास चुक केल्यास अगर नाकारल्यास चौकशी अधिकारी तुमचेविरुध्द चौकशी करतील.

तुमचे लक्ष महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम 1964 चे नियम 6 कडे वेधण्यात येत असून त्यामध्ये असलेल्या तरतुदीनुसार कोणत्याही जिल्हा परिषद कर्मचऱ्यांने त्याच्या सेवासंबंधी बाबीच्या हितासाठी चालना मिळण्यासाठी कोणत्याही वरिष्ठ अधिकाऱ्यावर बाह्य दबाब आणण्याचा प्रयत्न करता येणार नाही. जर तुमचेविरुध्द चालू

असलेल्या खाते चौकशी प्रकरणात कोणत्याही बाबतीत तुमच्यासाठी अन्य व्यक्तीकडून निवेदन मिळाल्यास तुम्हाला या निवेदनाबाबत माहीती आहे असे गृहीत धरण्यात येईल आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम 1964 चे नियम 6 च्या भंग केल्याबाबत आपल्या विरुध्द कार्यवाही करण्यात येईल.

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,नांदेड

प्रतिलिपी :-

गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती,भोकर यांना यासोबत नोटीसीच्या 3 प्रतीत जोडपत्र-1 ते 4 सह पाठविण्यात येत आहे. त्यातील मुळप्रत श्री.निलगिरवार,प्राथमिक शिक्षक, जि.प.प्रा.शा. नुतन,भोकर यांना बजावून दुसऱ्या प्रतीवर व जोडपत्र-1 ते 4 वर तारीख नमुद करुन त्याची पोहच दाखल स्वाक्षरी घेवून ती प्रत त्वरीत या कार्यालयास पाठवावी. तिसरी प्रत आपले दप्तरी ठेवावी. श्री.निलगिरवार,प्राथमिक शिक्षक, जि.प.प्रा.शा. नुतन,भोकर यांनी मुदतीत सादर केलेला खुलासा आपले अभिप्रायासह त्वरीत उलट टपाली पाठवावा. जर त्यांनी मुदतीत खुलासा सादर केला नाही तर संबंधीताचा खुलासा सादर केला नाही असे गृहीत धरुन त्यांचेवर एकतर्फी चौकशी करणेबाबत विशेष चौकशी अधिकारी, विभागीय आयुक्त,कार्यालय,औरंगाबाद यांची नियुक्ती केली जाईल.

स्थळ प्रत - मा. मु. का. अ. यांची स्वाक्षरीत असे

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,नांदेड

परिशिष्ट-1

श्री.एस.ए. निलगिरवार,प्राथमिक शिक्षक, जि.प.प्रा.शा. नुतन,भोकर यांचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाची यादी

आरोप क्र.1 :- दिनांक 12.10.2015 ते दि.26.10.2015 या कालावधीत केलेल्या धरणे आंदोलनात सहभाग नोंदवून असंवैधानिक भाषा वापरुन आंदोलनातील अन्य शिक्षकांना प्रशासना विरुध्द भडकावणे.

आरोप क्र.2 :- महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम 1967 चे नियम 3 चे उल्लंघन करणे.

स्थळ प्रत - मा. मु. का. अ. यांची स्वाक्षरीत असे

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,नांदेड

परिशिष्ट-2

श्री.एस.ए. निलगिरवार, प्राथमिक शिक्षक, जि.प.प्रा.शा. नुतन,भोकर यांचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाचे विवरण

दोषारोप क्र.1 :- दिनांक 12.10.2015 ते दि.26.10.2015 या कालावधीत केलेल्या धरणे आंदोलनात सहभाग नोंदवून असंवैधानिक भाषा वापरुन आंदोलनातील अन्य शिक्षकांना प्रशासना विरुध्द भडकावणे.

महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ,जिल्हा शाखा नांदेड च्या वतीने दिनांक 12.10.2015 ते दि.26.10.2015 या कालावधीत जिल्हा परिषद कार्यालयासमोर केलेल्या धरणे आंदोलनात आपण असंवैधानिकरित्या भाषण करुन अन्य आंदोलकांना प्रशासना विरुध्द भडकावले आहे. व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी व प्रशासना विरुध्द आक्षेपार्ह घोषणा देऊन सेवाशर्ती चा भंग केला आहे. व इतर शिक्षकांना आक्षेपार्ह भाषा वापरण्यापासून प्रतिबंध केला नाही.

आपण असे भाषण केल्यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम 1967 मधील नियम 3 व 5 चा भंग केला आहे म्हणुन आपण महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम 1964 मधील भाग तीन नियम 4(7) प्रमाणे शिक्षेस पात्र आहात.

दोषारोप क्र.2 :- महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम 1967 चे नियम 3 चे उल्लंघन करणे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम 1967 च्या नियमात शासकीय कर्मचाऱ्यांने त्याचे वर्तण सचोटीचे व चारित्र्यवान असले पाहीजे असे नियम आहे. तसेच कर्मचाऱ्यांने शासनाच्या विरोधात टिका टिप्पणी करतांना मर्यादेचे बंधन आहे. आपण हे सर्व बंधनाचा भंग करुन शिक्षकीय पेशात कार्यरत असतांना भाषणाव्दारे केलेली टिका टिप्पणी अत्यंत अशोभणीय व व्यक्तीव्देष मुलक असल्यामुळे आपण सदरील वर्तवणूक नियमाचा भंग केला असल्यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम 1964 नुसार शिक्षेस निश्चित पात्र आहात.

स्थळ प्रत - मा. मु. का. अ. यांची स्वाक्षरीत असे

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,नांदेड

परिशिष्ट-3

श्री एस.ए. निलगिरवार, प्राथमिक शिक्षक, जि.प.प्रा.शा. नुतन, भोकर यांचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाचे अनुषंगाने साक्षीदारांची यादी.

1. उपशिक्षणाधिकारी (प्रा), आस्थापना, शिक्षण विभाग,जिल्हा परिषद,नांदेड.(कार्यरत).
2. श्री.डी.डी.शिरसाठ,विस्तार अधिकारी (शिक्षण) शिक्षण विभाग,जिल्हा परिषद,नांदेड.
3. श्री.आर.एम.रोटे, विस्तार अधिकारी (शिक्षण) शिक्षण विभाग,जिल्हा परिषद,नांदेड.
4. श्री.एम.बी.मठपती,कनिष्ठ सहाय्यक, शिक्षण विभाग,जिल्हा परिषद,नांदेड.

स्थळ प्रत - मा. मु. का. अ.यांची स्वाक्षरीत असे

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,नांदेड

परिशिष्ट-4

श्री एस.ए. निलगिरवार, प्राथमिक शिक्षक, जि.प.प्रा.शा. नुतन, भोकर यांचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाचे अनुषंगाने पुराव्याची यादी.

1. दिनांक 12.10.2015 ते 26.10.2015 या कालावधीत धरणे आंदोलन मध्ये केलेल्या भाषणाची सि.डी व मोबाईल क्लिप व टंकलिखित प्रमाणित प्रत.

स्थळ प्रत - मा. मु. का. अ.यांची स्वाक्षरीत असे

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,नांदेड

दिनांक 12.10.2015 ते 26.10.2015 या कालावधीत धरणे आंदोलन मध्ये श्री एस.ए. निलगिरवार यांनी केलेल्या भाषण

सर्व शिक्षक बांधवांना माझा नमस्कार. शिक्षक मित्रहो, उन्हाळ्याची सुटी नाही, दिवाळीची सुटी नाही, चाचणीवर चाचणी, चाचणीवर चाचणी, कसं करावं आम्ही ? एकीकडे पालकांचा तगादा, दुसरीकडे अभिमन्यु काळे साहेबांचा तगादा. महाराष्ट्रामध्ये कोणत्याच जिल्ह्यात 8.30 ते 4.30 / पाच पर्यंत शाळा कुठंच नाही. 800 तासिका, 1000 तासिका नाहीत. चंद्रपूरवाल्यांना नाहीत, नागपूरवाल्यांना नाहीत. फक्त नांदेड जिल्ह्यातच आहेत. महाराष्ट्रात एकच प्रकल्प राबवणारे, शिक्षण मंत्री म्हणतात, प्रगत महाराष्ट्र. आणि साहेब आमचे वेगवेगळे प्रकल्प राबवून आमच्या शिक्षकांना वेठीस धरून आमच्या शिक्षकांना त्रास देण्याचं काम करतात. विद्यार्थ्यांच्या भल्याचं नाही, शिक्षकांच्या भल्याचं नाही. शिक्षण हे पाहिजे कौशल्यप्रत. स्कील डेव्हलप. अहो, शिक्षण पध्दती सुधारायला निघालात तर येथून नव्हे, तेथून सुधारा. नांदेड जिल्ह्यातून नाही. नांदेड जिल्हा शिक्षण क्षेत्रामध्ये एक आहे. नांदेड जिल्ह्यानं दाखवून दिलेलं आहे की नांदेड जिल्हा शिक्षण क्षेत्रामध्ये नंबर एक आहे. (यानंतर घोषणाबाजी झाली.)

उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद नांदेड